| MHWR030003432002 | **नियमित फौजदारी खटला क्र.५७३/२००२**<br>**महा.शासन वि. संजय अग्रवाल व इतर.**<br>**नि.क्र.१०७९** |
|---|---|

**<u>आदेश नि.क्र.१०७९ वर.</u>**
**<u>(दि.१०.०८.२०२६)</u>**

आरोपी क्र.१ विरुध्द पारीत करण्यात आलेला गैरजमानती अधिपत्रचा आदेश रद्द करण्याचा अर्ज दाखल करण्यात आला. सदरचा अर्ज हा फौजदारी संहिता कलम ७०(२) अन्वये दाखल करण्यात आला असून आरोपीची मागणी आहे की दि.२७.०७.२०२६ रोजी पारीत करण्यात आलेला गैरजमानती अधिपत्राचा आदेश मागे घ्यावा किंवा तो रद्द करण्यात यावा.

२. आरोपी क्र.१ चे म्हणणे आहे की आरोपी हा न्यायालयाच्या आदेशाचे तसेच सदर प्रकरण प्रलंबित ठेवण्याचे वर्तवणुकीचा नाही. आरोपीचे म्हणणे आहे की त्याने नि.क्र.१०५१ वर आभासी तंत्रज्ञानाद्वारे हजर होण्याचा अर्ज दाखल केला होता तो अर्ज दि.२३.०७.२०२६ रोजी नामंजुर करण्यात आला कारण त्यासोबत मा.उच्च न्यायालयाचे परीशिष्ट–२ दाखल केलेले नव्हते. आरोपीचे म्हणणे आहे की त्याने सदरच्या अर्जाने न्यायालयास दाखवून दिले की त्यास सदर प्रकरण चालवायचे आहे प्रलंबित ठेवायचे नाही.

३. आरोपीचे पुढे म्हणणे आहे की दि.२७.०७.२०२६ रोजी आरोपीचे तारीख सदरच्या न्यायालयात होती. त्या दिवशी आरोपीने न्यायालयासमक्ष हजर होणे गरजेचे होते परंतु आरोपीस नागपूर येथील न्यायालयाकडे हजर रहावे लागले तसेच त्याचे मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे एक प्रकरण होते. त्यामूळे त्यास तिथे हजर रहावे लागत होते.

४. आरोपीचे म्हणणे आहे की दि.२७.०७.२०२६ रोजी एकाच दिवशी दोन वेगवेगळया न्यायालयासमक्ष प्रकरण प्रलंबित होते त्यामूळे त्याला दोन वेगवेगळया न्यायालयासमक्ष हजर राहणे शक्य नव्हते त्यामूळे तो वर्धा नयायालयासमक्ष त्याचे एक नागपूर येथील प्रकरण असल्यामूळे हजर राहू शकला नाही तेव्हा त्यास सदरचे प्रकरण

टाळाटाळ करीत असल्याचा मुद्दा नाही.

५. आरोपी क्र.१ चे पुढे म्हणणे आहे की, दि.२७.०७.२०२३ रोजी आरोपीचे वकील न्यायालयासमक्ष प्रथम सत्रात हजर होते व त्यांनी न्यायालयासमक्ष स्पष्टीकरण देण्याचे प्रयत्न केला. परंतु गैरहजेरीचा अर्ज तयार केला नाही. न्यायालयाने दुपारी १.०० पर्यत कोणताही अर्ज आला नसल्यामूळे दुपारी १.१४ वाजता गैरजमानती अधिपत्राचा आदेश केला. त्या दिवशी आरोपी हा दुस–या न्यायालयासमक्ष हजर रहावे लागत असल्यामूळे या न्यायालयासमक्ष हजर राहू शकला नाही कारण त्याचे गैरहजेरीचे कारण हे कायदेशीर होते.

६. आरोपीचे पुढे म्हणणे आहे की कायदयाच्या दृष्टीने गैरजमानती अधिपत्र काढण्याचे शेवटचे पर्याय आहे. परंतु दि.२७.०७.२०२६ रोजी आरोपी न्यायालयासमक्ष हजर राहू शकला नाही कारण त्याला दुस–या न्यायालयामध्ये हजर रहावे लागत होते. आरोपीचे म्हणणे आहे की मा.उच्च न्यायालयाचे क्रिमीनल रिट पिटीशन ४४१९/२०१३ ची प्रत त्याने दाखल केलेली आहे. ज्यामध्ये ३० मार्च २०२६ रोजी आरोपी वर्धा न्यायालयात हजर होता व उस्मानाबाद न्यायलायाने त्याचे विरुध्द गैरजमानती अधिपत्र काढले व आरोपी विरुध्द गैरजमानती अधिपत्र रद्द करण्याचा अर्ज त्याच दिवशी दाखल केला तो अर्ज न्यायालयाने नाकारला म्हणून मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी अंतरीम स्थगीती दिलेली होती. त्याची प्रत आरोपीने दाखल केलेली आहे.

७. आरोपीचे पुढे म्हणणे आहे की आरोपी सदर प्रकरणात न्यायालयास सहाकार्य करण्यास तयार आहे. आरोपी स्वतः न्यायालयासमक्ष हजर राहण्यास तयार आहे परंतु आरोपीविरुध्दचा गैरजमानी अधिपत्र रद्द न केल्यास आरोपीचे नुकसान होत असून त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतल्या जाणार आहे.

८. आरोपीचे पुढे म्हणणे आहे की तो अस्थमा सारख्या आजाराने पिडीत आहे. त्याला वारंवार एका शहरातून दुस–या शहरात जावे लागत असल्यामूळे तो सतत आजारी राहतो म्हणून तो आज आराम करीत असल्यामूळे न्यायालयासमक्ष हजर राहू शकत नाही. त्यामूळे सदरचा अर्ज आरोपीचे गैरहजेरीत मंजुर करुन त्याचे विरुध्द पारीत करण्यात आलेला गैरजमानती अधिपत्र रद्द करण्यात यावे.

९. सदर अर्जावर सरकार पक्षाने त्यांचा जबाब दिला असून अर्जास प्रखर विरोध दर्शविलेला आहे. आरोपीचे हजेरीत सदर प्रकरण प्रत्येक तारखेत चालविणे गरजेचे आहे. आरोपी गैरहजर राहतो त्यामूळे प्रकरण पुढे चालू शकत नाही त्यामूळे न्यायालयाने दि.२७.०७.२०२६ रोजी आरोपी क्र.१ विरुध्द गैरजमानती अधिपत्र जारी केलेले आहे.

१०. असे कळले आहे की ३१.०७.२०२६ रोजी आरोपी क्र.१ हा वर्धा न्यायालयाचे परीसरात हजर होता परंतु त्याने गैरजमानती अधिपत्र रद्द करण्याचा अर्ज दिला नाही. त्यामूळे आरोपी हा केवळ प्रकरण हेतुपुरस्सर प्रलंबित करण्याचे वर्तवणुकीचा असल्याचे दिसून येते.

११. सरकार पक्षाचे पुढे म्हणणे आहे की अर्जातील कारण मान्य करण्याजोगे नाही. गैरजमानती अधिपत्र जारी केले त्यादिवशी आरोपी क्र.१ किंवा त्याचे वकील न्यायालयासमक्ष हजर नव्हते. आरोपीच्या अर्जातील कारणाप्रमाणे तो दुस–या न्यायालयासमक्ष व्यक्तीशः हजर होता यावरुन असे दिसून येते की आरोपी क्र.१ हा या न्यायालयासमक्ष व्यक्तीशः हजर होवू शकत नाही जेणेकरुन प्रकरण केवळ प्रलंबित रहावे.

१२. आरोपीने दिलेले ***मा.मुंबई उच्च न्यायालयाचे अरुण कुमार वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र*** या न्यायनिर्णयाचे निकष हे कलम १३८ परक्राम्य लेख कायदयाअन्वये दाखल झाले होते त्यामूळे त्या प्रकरणाची कथन व परीस्थीती या न्यायालयासमक्ष असलेल्या प्रकरणापेक्षा वेगळी आहे. तसेच आरोपीने दाखल केलेले ***संजय अग्रवाल वि.स्टेट ऑफ महाराष्ट्र*** यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने आरोपीस कायमस्वरुपी गैरहजेरी मंजुर केली होती. त्यामूळे वरील दोन्ही प्रकरणांचे न्यायनिर्णयाचे निकष या प्रकरणात लागू होत नाही.

१३. सरकार पक्षाचे पुढे म्हणणे आहे की आरोपी क्र.१ ने सदर अर्जामध्ये कोठेही तो या न्यायालयासमक्ष प्रत्यक्षरित्या हजर होवू शकत नाही ही परीस्थीती किंवा दस्तऐवज दाखल केलेले नाही. त्यामूळे आरोपी विरुध्दचा गैरजमानती अधिपत्र रद्द केल्यास आरोपी हा न्यायालयासमक्ष गैरहजर राहील व २४ वर्ष जुने प्रकरण प्रलंबित राहील म्हणून आरोपीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

१४. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला. तसेच दि.२३.०७.२०२६ व २७.०७.२०२६ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात आले –

## <u>आदेश नि.क्र.१ वर.</u>
## <u>(दि.२३.०७.२०२६)</u>

सदर प्रकरण पुराव्यासाठी असून तपास अधिकारी श्री.एस.जी.देशपांडे, वय वर्ष ७६ आज सकाळी ११.१० पासून १.३० पर्यत न्यायालयासमक्ष हजर आहे. आरोपी क्र.१ याचा दुपारी १.३० पर्यत वारंवार पुकारा करता गैरहजर. आरोपीचे वकील श्री.पी.ए.तांबोळी व श्री.एन.व्ही.पवार यांचा पुकारा दुपारी १.३० पर्यत करता गैरहजर. आरोपीतर्फे के.पी.वर्मा वकीलांनी दुपारी १.३० वाजता श्री.एन.व्ही.पवार या वकीलांना बोलविणे पाठविल्यानंतर गैरहजेरीचा अर्ज दिलेला आहे. परंतु सदर अर्जात गैरहजेरीबाबत वाद नसल्याचा कोणताही मजकुर नमुद केलेला नाही. आरोपी क्र.१ हा न्यायालयासमक्ष हजर राहत नाही. आरोपीने नियुक्त केलेले वकील यांना सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिशानिर्देशाप्रमाणे मा.उच्च न्यायालयाने घातलेल्या अटींनुसार आठवडयातील दोन दिवस ठेवण्यात येते याची माहिती आहे. परंतु ते चालविणेकामी अर्ज सुध्दा या न्यायालसमक्ष दुपारी १.३० पर्यत येत नाही. आरोपी क्र.१ याने या न्यायालयासमक्ष आभासी तंत्रज्ञानाद्वारे हजर राहण्याचा अर्ज दिला, परंतु मा.उच्च न्यायालयाचे परीपत्रकाप्रमाणे कोणतीही माहिती सदर अर्जासोबत दिली नाही व सदर अर्जावर युक्तीवाद करण्यास आरोपी गैरहजर आहे. आरोपीतर्फे कायमस्वरुपी गैरहजेरीचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

२. सदरचे प्रकरण सन २००२ पासून प्रलंबित आहे. साक्षीदार हजर असतांना आरोपी न्यायालयात हजर नसतो परंतु त्याचे गैरहजेरीचे अर्ज त्या नमुद केलेल्या कारणाचे विश्लेषण बघून मंजुर केले जातात व तपास अधिकारी यांचा पुरावा नोंदविला जातो. त्यामूळे गैरहजेरीची कायमस्वरुपी माफी सदर प्रकरण पुढे चालावे या कारणाने वेळोवेळी दिलेले अर्ज मंजुर करुन प्रकरण चालवत आहे. तेव्हा कायमस्वरुपी गैरहजेरी माफी दिल्यास या न्यायालयात आरोपी क्र.१ हजर राहणार नाही व त्यामूळे सदर प्रकरण हे पुढे चालविणे हे न्यायालयास शक्य होणार नाही कारण आरोपी हा सदर प्रकरणे चालविणे कामी केवळ प्रकरण प्रलंबित कसे राहील हा हेतू ठेवून दर तारखेत वेगवेगळे अर्ज दाखल करून प्रकरण प्रलंबित ठेवतो. त्यामूळे सदर प्रकरणातील तपास अधिकारी वय वर्ष ७६ हे न्यायालयासमक्ष

तब्ब्ल २५ वर्षांनी पुरावा देणे कामी हजर झाले आहे. त्यांची शारीरीक परीस्थीती साक्षीदाराच्या पिंज–यात सलग एक तास उभे राहून पुरावा देण्याची दिसून येत नाही. त्यामूळे प्रकरणातील त्यांचा पुरावा हा टप्प्या टप्प्याने नोंदविण्यात येत आहे. परंतु आज १.३० पर्यत सदर प्रकरणात कोणताही अर्ज व आरोपी क्र.१ न्यायालयासमक्ष हजर नाही. तेव्हा आरोपी क्र.१ यांस आजच शेवटची संधी म्हणून त्याचा अर्ज आल्यास मंजुर करता येईल अन्यथा त्याचे विरुध्द योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

स्वा/–

वर्धा. ( श्रीमती एम.वाय.डोईफोडे )

दि.२३.०७.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा

**आदेश नि.क्र.१ वर.**

**(दि.२३.०७.२०२६)**

सदर प्रकरणातील तपास अधिकारी वय वर्ष ७६ न्यायालयासमक्ष दुपारी २.०० वाजेपर्यत हजर. आरोपी क्र.१ दुपारी ३.०५ पर्यत गैरहजर. गैरहजेरीचा अर्ज ३.०५ वाजता दाखल. आरोपी याने ०३.०५ पर्यत गैरहजेरीचा अर्ज तसेच तहकुबीचा अर्ज देण्याची तसदी घेतली नाही. तपास अधिकारी यांचा पुरावा नोंदविणे कामी आरोपी क्र.१ ची हजेरी न्यायालयासमक्ष असणे गरजेचे आहे कारण आरोपीस नैसर्गिक न्यायतत्वाचे पालन करुन त्याचे हजेरी साक्ष नोंदविणे आवश्यक आहे. परंतु आरोपी यास सदर प्रकरण केवळ प्रलंबित करणे असल्यामूळे आरोपी हा साक्षीदार हजर होवूनही न्यायालयासमक्ष हजर राहत नाही. तसेच गैरहजेरीचा व तहकुबीचा अर्ज दाखल करीत नाही. आज दाखल केलेला अर्ज हा दुपारी ३.०५ वाजा दाखल केला असून तपास अधिकारी ज्येष्ठ नागरीक असल्यामूळे ते न्यायालयासमक्ष सकाळी ११.१० पासून २.०० पर्यत हजर होते आणि दुस-या सत्रात ते त्यांचे वैयक्तीक कारणाने न्यायालयासमक्ष हजर नाहीत. अश्या परीस्थीतीत न्यायालयाची कुचंबना की जेणेकरुन प्रकरण हे लवकरात लवकर निकाली काढणे आहे. परंतु आरोपी क्र.१ त्यास सहकार्य करीत नाही तेव्हा आज आरोपीने दिलेला गैरहजेरीचा अर्ज फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २०५ अन्वये शेवटची संधी म्हणून मंजुर करण्यात आला. याची नोंद आरोपी

व त्यांचे वकीलांनी घ्यावी व पुढील तारखेस हजर न राहिल्यास योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

स्वा/-

वर्धा.

( श्रीमती एम.वाय.डोईफोडे )

दि.२३.०७.२०२६

मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा.

RCC No.300573/2002
State Vs. Sanjay Agrawal & Others
Exh.No.01

**Order**

(Date 27.07.2026)

As per the direction given to the accused on 23.07.2026 given to the accused No.1. He shall remain present before Court at 11.00 a.m. Accused No.1 is absent other accused No.5, 8, 11 to 13 filed their exemption application on record. I.O. is present for evidence till 01.00 p.m. accused is absent. No exemption till time. Hence, issue N.B.W against accused No.1.

Sd/-

Place:-Wardha

(Smt.M.Y.Doiphode)

Date:- 27.07.2026.

Chief Judicial Magistrate
Wardha.

१५. सदरच्या प्रकरणाच्या अनुशंगाने वरील तिन्ही आदेश सविस्तर पारीत केल्यानंतर आरोपीस दि.२७.०७.२०२६ रोजी न्यायालयासमक्ष हजर होण्याचे आदेश देण्यात आले होते. वरील आदेश बघता आरोपीच्या गैरहजेरीचे अर्ज हे ७६ वर्षाचे तपासी अधिकारी न्यायालयासमक्ष हजर असतांनाही दुपारी ३.०५ पर्यत कोणताही गैरहजेरीचा अर्ज अभिलेखावर नाही त्यामूळे साक्षीदाराचा पुरावा आरोपी क्र.१ च्या गैरहजेरीत नोंदविणे शक्य होत नाही. दि.२७.०७.२०२६ रोजी तपास अधिकारी हजर. परंतु दुपारी १.०० पर्यत कोणताही गैरहजेरी माफीचा अर्ज आरोपीतर्फे दाखल करण्यात आलेला नाही. नि.क्र.१ चे अवलोकन केले असता आरोपी विरुध्द यापुर्वी दि.१७.१०.२०२५, ०८.०१.२०२६, २३.०९.२०२५ या तारखांना गैरजमानती अधिपत्र जारी करण्यात आलेले आहे. त्यामूळे आरोपी कितीही म्हणत असला की तो सदर प्रकरण चालविण्यास तयार आहे. तो दर

तारखेस हजर राहील परंतु वरील तारखां बघता आरोपींस वारंवार गैरजमानती अधिपत्र काढून न्यायालयाने सदर प्रकरणाचे वय बघता रद्द केल्याचे दिसून येते.

१६. परंतु या न्यायालयासमक्ष सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयाने जरी निकाली काढण्याची मुदत ठेवली नसली तरी मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर या न्यायालयास प्राप्त झालेले एससी (सी) ६२६/२०२५ दि.१०.११.२०२५ रोजीच्या पत्रानुसार सदर प्रकरण हे लवकरात लवकर निकाली काढण्याचे आदेश दिलेले आहे. तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाचे आरजी/२७/२०२५ यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालयाचे कालबध्द केलेले प्रकरणे निकाली काढण्याच्या उपायोजना दिलेल्या आहे. एवढेच नसून या न्यायालयास महिन्याच्या अखेरीस मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे सदर प्रकरणाचे महिन्या भरात झालेल्या कामकाजाचे विवरण देणे आवश्यक आहे. तेव्हा या सर्व बाबींची पुर्तता करतेवेळी आरोपीचे गैरहजेरीत सदर प्रकरणात तपास अधिकारी यांचा आरोपीच्या गैरहजेरीचा कोणताही अर्ज नसतांना पुरावा नोंदविणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या व्याख्येत बसत नसल्यामूळे आरोपीची गैरहजेरी प्रकरण चालविण्यास बाधा येणारी आहे.

१७. सदर प्रकरणाचा रोजनामा बघता जरी आरोपीचे म्हणणे आहे की त्यास व्ही.सी.द्वारे हजर राहण्याची परवानगी दयावी. आरोपी विरुध्द विविध न्यायालयात प्रकरणे प्रलंबित आहे. आरोपीस मा.मुंबई उच्च न्यायालयाचे व्ही.सी.रुलबाबत संपुर्ण माहिती असतांना केवळ प्रतिज्ञापत्रावर लिहिलेला अर्ज विचारात घेता येणार नसून तो अर्ज आरोपीने केवळ वेळकाढूपणासाठी दिलेला आहे. आरोपीच्या प्रकरणाचा संपुर्ण रोजनामा बघता सन २०२५ मध्ये दि.११.०७.२०२५, २३.०७.२०२५, ०६.०८.२०२५, १२.०८.२०२५, १४.०८.२०२५, १८.०८.२०२५, २१.०८.२०२५, २५.०८.२०२५, २८.०८.२०२५, ०२.०९.२०२५, ०४.०९.२०२५, ०८.०९.२०२५, २३.०९.२०२५, ११.०९.२०२५, १५.०९.२०२५, १८.०९.२०२५, ३०.१०.२०२५, ०३.११.२०२५, ०६.११.२०२५, १०.११.२०२५, १७.११.२०२५, २०.११.२०२५, २४.११.२०२५, २७.११.२०२५, ०१.१२.२०२५, ०४.१२.२०२५, ०८.१२.२०२५, ११.१२.२०२५, २३.१२.२०२५, ०१.०१.२०२६, ०५.०१.२०२६, ०८.०१.२०२६ गैरहजेरीचा अर्ज

नाही, ०५.०२.२०२६, ११.१२.२०२६, १७.०२.२०२६, २३.०२.२०२६, २६.०२.२०२६, ०५.०३.२०२६, ०९.०३.२०२६, १३.०४.२०२६, २०.०४.२०२६, २७.०४.२०२६, ०४.०५.२०२६, १६.०३.२०२६, २३.०३.२०२६, ३०.०३.२०२६, ०८.०५.२०२६, १४.०५.२०२६, २१.०५.२०२६, ०१.०६.२०२६, ०६.०६.२०२६, ०८.०६.२०२६, १८.०६.२०२६, २२.०६.२०२६ अर्ज नामंजुर, २९.०६.२०२६ अर्ज नामंजुर, ०६.०७.२०२६, ०९.०७.२०२६, १६.०७.२०२६, २०.०७.२०२६, २३.०७.२०२६ या तारखांमध्ये आरोपीचे गैरहजेरीचे अर्ज दाखल असून ते सदर प्रकरण पुढे चालावे या कारणास्तव मंजुर करण्यात आल्याचे दिसून येतात. परंतु २२.०६.२०२६ पासून आरोपीचे गैरहजेरीचे अर्ज नामंजुर करण्यात आले तरीही आरोपी हा न्यायालयासमक्ष हजर झला नाही. त्यानंतर आरोपीचे वकीलांनी साक्षीदार हजर असल्याने गैरहजेरीचे दिलेले अर्ज दि.२३.०७.२०२६ पर्यत केवळ प्रकरण पुढे चालावे या एकाच उद्देशाने मंजुर करण्यात आले. परंतु दि.२३.०७.२०२६ रोजी नि.क्र.१ वर आदेश पारीत करुनही आरोपी या न्यायालयासमक्ष हजर राहीलेला नाही. त्यामूळे दि.२७.०७.२०२६ रोजी साक्षीदार वारंवार हजर होवूनही आरोपी प्रकरण चालविण्यास न्यायालयाास सहकार्य करण्याच्या मनस्थीतीत नसल्याने आरोपीविरुध कोणताही गैरहजेरीचा अर्ज नसल्याने सविस्तर आदेश नि.क्र.१ वर पारीत करुन गैरजमानती अधिपत्र जारी करण्यात आले होते.

१८. जर का आरोपीचे म्हणणे आहे की तो दि.२७.०७.२०२६ रोजी नागपूर न्यायालयासमक्ष हजर होता तर तो दि.०३.०८.२०२६ रोजी तसा अर्ज न्यायालयात दाखल करु शकला असता परंतु दि.०३.०८.२०२६ रोजी आरोपीने कोणताही अर्ज न्यायालयात दाखल केलेला नाही. आज सदरचा अर्ज गैरजमानती अधिपत्र रद्द करण्याची मागणी आरोपी तो नागपूर येथील न्यायालयामध्ये दि.२७.०७.२०२६ रोजी हजर होता हे कारण पुढे करुन त्याचे गैरहजेरीत सदर प्रकरणात गैरजमानती अधिपत्र जारी करण्यात आले अशी जर त्याचे म्हणणे आहे तर हे म्हणणे तो दि.०३.०८.२०२६ किंवा त्यापुर्वी २८.०७.२०२६ रोजी सुध्दा न्यायालयात हजर होवून सांगू शकत होता. आरोपीने त्याचे अर्जासोबत दाखल केलेले दस्तऐवज सूची नि.क्र.१०८१ यामध्ये आरोपी क्रमांक ३ हा

न्यायालयासमक्ष हजर होता असा दैनंदिन बिझनेस दाखल केलेला आहे. परंतु त्या प्रकरणात तो आरोपी क्र.३ आहे किंवा कसे याबाबत हे न्यायालय अनभिज्ञ आहे. आरोपीने सदर दस्त सूचीसोबत दस्त क्रमांक २ दाखल केलेला असून त्यामध्ये सुध्दा आरोपीने त्याचे विरुध्द सदर प्रकरणे प्रलंबित असल्याचे व त्याच्या तारखा एकाच दिवशी वेगवेगळया न्यायालयांमध्ये असल्याचे दाखविलेले आहे परंतु या न्यायालयासमक्ष दि.२७.०७.२०२६ रोजी आरोपी नागपूर येथील न्यायालयासमक्ष हजर होता म्हणून तो या न्यायालयात येवू शकत नाही असा कोणताही गैरहजेरी माफीचा अर्ज दाखल नव्हता.

१९. सदर प्रकरणाची परिस्थीती व कथन हे आरोपीने दाखल केलेले न्यायनिर्णयाचे निकषांपेक्षा वेगळी आहे. तेव्हा आरोपी हा केवळ त्याच्या विविध न्यायालयासमक्ष प्रलंबित असलेल्या प्रकरणांशी सदरचा आदेश रद्द करण्यासाठी गैरफायदा घेत असल्याचे दिसून येते कारण या पुर्वीच तारखेवार आरोपीने या सन २०२५–२०२६ मध्ये वेळोवेळी प्रकरण पुढे चालावे या कारणाने दिलेले गैरहजेरी माफीचे विवरण बघता आरोपीने या न्यायालयासमक्ष गैरहजेरीचा अर्ज सादर करणे गरजेचे होते व त्यास प्रकरण आठवडयातील दोन दिवस ठेवले जाते हयाची माहिती आहे. परंतु तसे न करता आरोपी हा त्याचे गैरहजेरीत आज त्याचे विरुध्र गैरजमानती अधिपत्र रद्द करण्याचा अर्ज दाखल करतो. तो या न्यायालयासमक्ष प्रत्यक्षरित्या का हजर राहू शकत नाही याबाबतचा केवळ तो अस्थमाचा रुग्ण आहे या खेरीज दुसरा कोणताही मजकुर नाही ते दाखविण्यासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र नाही.

२०. तेव्हा अश्या परीस्थीतीत आरोपी हा हे प्रकरण चालविण्यास न्यायालयास सहकार्य करीत नाही असा निष्कर्ष काढता येईल. आरोपीस वाटेल त्यावेळी तो न्यायालयासमक्ष गैरहजेरीचे अर्ज सादर करतो किंवा करतही नाही व प्रकरण कसे प्रलंबित ठेवता येईल याकडे आरोपीचा कल दिसून येतो. तेव्हा अश्या परीस्थीतीत आरोपीच्या गैरहजेरीत आरोपीचे विरुध्द जारी गैरजमानती अधिपत्र आरोपी प्रकरण चालविण्यास सहकार्य करीत नसल्यामूळे मंजुर करता येणार नाही. त्यामूळे आरोपीचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र ठरतो. तेव्हा पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

MRUNAL YASHWANT DOIPHODE

Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE
Date: 2026.08.10 18:03:02 +0530

वर्धा. ( श्रीमती एम.वाय.डोईफोडे )

दि.१०.०८.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा.